# पुस्तकाचा प्रवास... माध्यमांच्या पल्याडचा!

## प्रा. पाटुकले यांच्या 'कर्दळीवन : एक अनुभूती' पुस्तकाचा अनुभव

**चिन्मय पाटणकर, पुणे**

एखादे पुस्तक मुद्रित माध्यमाबरोबरच दृश्य, श्राव्य, ब्रेल आणि ई बुक या सर्व माध्यमांमध्ये पोहोचल्याचे उदाहरण अद्याप मराठी साहित्यविश्वात झाल्याचे नाही. मात्र, ही उणीव प्रा. क्षितिज पाटुकले यांच्या 'कर्दळीवन : एक अनुभूती' या पुस्तकाने ही उणीव भरून काढत माध्यमांच्या पल्याडचा प्रवास पूर्ण केला आहे. हे पुस्तक इंग्रजीसह सहा प्रादेशिक भाषांमध्ये अनुवादित होण्याबरोबरच ब्रेल लिपी, ई-बुक, ऑडिओ बुक आणि माहितीपटाच्या माध्यमातूनही साहित्यप्रेमींपर्यंत पोहोचणार आहे.

गेल्याच वर्षी प्रकाशित झालेल्या 'कर्दळीवन - एक अनुभूती' या पुस्तकाच्या वर्षभरात १२ आवृत्त्या प्रकाशित झाल्या आहेत. अक्कलकोटच्या स्वामी समर्थांचे प्रकटस्थान, नागपंथी साधू आणि योगीजनांचे साधनास्थळ म्हणून कर्दळीवन देशभरात ख्यात आहे. प्रा. पाटुकले यांनी या पुस्तकात कर्दळीवनाची आध्यात्मिक अनुभूती स्पष्ट करतानाच तिथल्या जैवविविधतेवरही प्रकाश टाकला आहे. कर्दळीवन सेवा संघ या संस्थेने हे प्रकाशित केलेले हे पुस्तक इंग्रजीसह गुजराती, हिंदी, संस्कृत, कन्नड, तेलुगू आणि तमीळ या

**मटा विशेष**

प्रादेशिक भाषांमध्येही अनुवादित झाले आहे. तसेच, सरोजा टोळे यांनी ब्रेल लिपी, वीणा सहस्त्रबुद्धे यांनी ऑडिओ आणि मंदार जोगळेकर यांनी ई बुक स्वरुपात हे पुस्तक तयार केले आहे. मराठी साहित्यक्षेत्रात प्रथमच एकच पुस्तक इतक्या विविध माध्यमातून साहित्यप्रेमींपर्यंत पोहोचण्याचा योग जुळून आला असून, एक जानेवारीला ते प्रकाशित होणार आहे.

पुस्तकाच्या विविध माध्यमांमध्ये झालेल्या या अनोख्या प्रवासाची माहिती देताना पाटुकले म्हणाले, 'कोणत्याही लेखकाला पुस्तकाला इतके यश मिळणे आनंददायीच आहे. दत्त संप्रदाय देशभरात विखुरला असल्याने कर्दळीवन या स्थानाविषयी अनेकांना उत्सुकता आहे. या उत्सुकतेमुळेच हे पुस्तक यशस्वी ठरले. हे पुस्तक आपल्या भाषेतही यावे, या उद्देशाने त्या प्रादेशिक भाषेतील अनुवादकाने पुढाकार घेऊन भाषांतरित पुस्तक सिद्ध केले. तसेच, या स्थानाविषयी माहिती विविध माध्यमातून साहित्यप्रेमी, दत्तप्रेमींपर्यंत पोहोचविण्यासाठी माहितीपट, ऑडिओ आणि ई-बुकचा प्रयोग करण्यात आला आहे.'

पुस्तक नव्या पिढीला डोळ्यासमोर ठेवून लिहिण्यात आले आहे. तसेच, अध्यात्माच्या पलीकडे जाऊन संशोधनात्मक पद्धतीने त्याची मांडणी करण्यात आल्याने कोणत्याही वाचकाच्या ते पसंतीला उतरते, असेही त्यांनी सांगितले.